**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ ▪ अंक २०४ ▪ गुरुवार ७ मे २०२६ ▪ पाने ४ ▪ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## पोलीस अधीक्षक साहेब नवीन आहात, जिल्ह्यातील भामट्या सराफ व्यावसायिकांच्या मुसक्या आवळा

**देशमुख 'देशा'साठी तर आदापुरे सोन्याच्या हेराफेरीच्या 'अदाकारी'साठीच । त्या पोलीसवाल्याने सराफ व्यावसायिकांना गुन्हेगारीपासून रोखले, अन् सराफ व्यावसायिकांवर थेट आरोपच थोपले!**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बस प्रवासादरम्यान चोरी गेलेल्या तब्बल २२ तोळे सोन्याच्या दागिन्यांचा गुन्हा उघडकीस आणत कोतवाली पोलिसांनी तात्काळ व प्रभावी कारवाई करत चोरीचा तपास पूर्ण केला आणि २० तोळे सोने (२५ लाख रुपये कीमतीचे) जप्त करण्यात यश मिळवले. या कामगिरीबद्दल पोलिसांचे कौतुक होत असतानाच, चोरीचे सोने विकत घेणाऱ्या सराफावर देखील कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी नेवासा तालुक्यातील करजगाव येथील मिनाबाई ज्ञानदेव बडाख यांनी अप्पर पोलीस अधीक्षक यांना साकडे घातले आहे.

बडाख यांनी दिलेल्या निवेदनानुसार, ७ एप्रिल २०२६ रोजी त्या पुणे–पाथर्डी एसटी बसने अहिल्यानगरकडे येत होत्या. शिरूर (जि. पुणे) येथे दोन अनोळखी महिला बसमध्ये चढल्या. त्यापैकी एक महिला त्यांच्या शेजारी येऊन बसली. काही ▪ पान ४ वर

### गुन्ह्याच्या चौकशीत हस्तक्षेप करून सरकारी कामात अडथळा आणणाऱ्यांवर गुन्हा दाखल का नाही?

मिनाबाई बडाख यांचे वीस तोळे सोने चोरी करून एका महिलेने सराफ भागवत आदापुरे यांना विकले होते. मात्र या तपासाकामी संशयितांना ताब्यात घेतल्यानंतर काही संघटनांनी तापसी अधिकारी व काही सहकारी कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की करत तपासात अडथळा निर्माण केला होता मात्र पोलिसांनी त्यांच्यावर कोणतीही कारवाई काय केली नाही हे अद्यापही गुलदस्त्यातच आहे.

### चोरी करणारी महिला अटक पण चोरीचे सोने घेणारा मोकाट....?

मीनाबाई बडाख यांनी पोलीस अधीक्षकांकडे दिलेल्या निवेदनात सराफ भागवत आदापुरे यांना देखील या गुन्ह्यात आरोपी करण्यात यावे, व अशा सराफांना पाठीशी घालणाऱ्या सराफ संघटनेच्या पदाधिकारी यांच्यावर देखील कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. अन्यथा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

### चोर सोडून संन्याशाला फाशी!

कोतवाली पोलिसांच्या जलद आणि निष्पक्ष तपासामुळे चोरीचा गुन्हा अल्पावधीत उघडकीस आला असला, तरी या प्रकरणातील चोरीचे सोने घेणारे सराफ यांच्या बाजूने सुवर्णकार समितीचे पदाधिकारी उमेश बुऱ्हाडे यांनी उलट कोतवाली पोलिसांवर कारवाई करावी, अशी मागणी करत मागील काही दिवसापासून पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या समोर उपोषण सुरू केलेले आहे. त्या अनुषंगाने उमेश बोराडे व त्यांचे पदाधिकारी यांच्या विषयी माहिती घेता, हे लोक सातत्याने ज्या ज्या ठिकाणी पोलीस अशा चोरीचे सोने घेणाऱ्या सराफांकडून सोने जप्तीची कारवाई करीत असतात, अशावेळी त्या ठिकाणी जाणीवपूर्वक प्रवेश करून संबंधित सराफ यांना चुकीच्या पद्धतीने मार्गदर्शन करून व वेगवेगळ्या मार्गाने प्रयत्न करून संबंधित सराफांनी सोने जप्ती देऊ नये म्हणून प्रयत्न करत असतात, अशा स्वरूपाची प्रेस नोट देखील सातारा पोलिसांनी यापूर्वीच प्रसिद्ध केलेली आहे. तसेच वालचंदनगर पोलिस स्टेशन येथे पण कायदेशीर प्रक्रियेने चोरीचे सोने तेथील पोलिसांनी हस्तगत केले असता सदर ठिकाणी जाऊन पोलिसांचा कारवाईत अडथळा आणण्याचा प्रयत्न केले बाबत नोंदी आहेत.याशिवाय सोलापूर, सांगली, कोल्हापूर आणि इतर विविध ठिकाणी उमेश बोराडे व त्याचे साथीदार यांनी सोने जप्तीला चुकीच्या पद्धतीने विरोध करण्याचा पायंडा पाडला आहे.

ग्रीन सिटी'साठी मनपाची जोरदार तयारी

## एक लाख वृक्ष लागवडीसाठी प्रशासन सज्ज; नगरकरांनी सहभागी व्हावे – उपमहापौर ॲड. धनंजय जाधव

**नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेबाबत उद्यान विभागाची नियोजन बैठक**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहराला हरित, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक बनविण्याच्या दृष्टीने राबविण्यात येत असलेल्या 'नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी' मोहिमेची तयारी आता वेगाने सुरू झाली असून, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिका प्रशासनाने नियोजनाला गती दिली आहे. अहिल्यानगर महानगरपालिका आणि साई द्वारका सेवा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या या महत्त्वाकांक्षी मोहिमेअंतर्गत शहरात एक लाख झाडे लावण्याचा संकल्प करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या उद्यान विभागाची महत्त्वपूर्ण नियोजन बैठक आयुक्त यशवंत डांगे आणि उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली.

या बैठकीस उद्यान विभाग प्रमुख शशिकांत नजन, ग्रीन सिटी मोहीम समिती सदस्य कैलास दिघे, हर्षल आगळे, इंजिनिअर प्रताप काळे यांच्यासह उद्यान विभागाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीदरम्यान आयुक्त यशवंत डांगे यांनी उद्यान विभागाचा सविस्तर आढावा घेत शहरातील विविध भागांमध्ये वृक्षारोपणासाठी योग्य जागांची निवड, झाडांच्या प्रजाती, संवर्धनासाठी आवश्यक उपाययोजना आणि दीर्घकालीन देखभालीबाबत विविध सूचना दिल्या. शहरातील उद्याने, रस्त्यांच्या दुतर्फा जागा, मोकळी मैदाने आणि सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

यावेळी उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी पर्यावरण संवर्धनाच्या गरजेवर भर देत सांगितले की, ''जागतिक पर्यावरण दिन आला की अनेक ठिकाणी वृक्षारोपण केले जाते; मात्र त्यानंतर त्या झाडांच्या संवर्धनाकडे दुर्लक्ष होते. केवळ फोटोसेशनसाठी झाडे लावून उपयोग नाही, तर ती जगविणे अधिक महत्त्वाचे आहे. त्यामुळे 'ग्रीन सिटी' ही केवळ मोहिम नसून शहराच्या भविष्यासाठी सुरू केलेली लोकचळवळ आहे.

ते पुढे म्हणाले की, ''अहिल्यानगर शहर दिवसेंदिवस विकसित होत असताना पर्यावरणाचा समतोल राखणे अत्यंत गरजेचे झाले आहे. वाढते प्रदूषण, तापमानवाढ आणि कमी होत चाललेली हरितक्षेत्रे ही चिंतेची बाब आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने वृक्षारोपण आणि संवर्धनासाठी पुढे येणे आवश्यक आहे. नागरिकांच्या सहभागाशिवाय ही मोहीम यशस्वी होऊ शकत नाही. शहरातील प्रत्येक प्रभाग, संस्था, सामाजिक संघटना, युवक आणि विद्यार्थ्यांनी या मोहिमेत सहभागी होऊन हरित नगर घडविण्यासाठी योगदान द्यावे.

उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी उद्यान विभागालाही विशेष सूचना देत सांगितले की, ''महानगरपालिकेच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचे आदर्श काम उभे करायचे आहे. प्रत्येक लावलेले झाड जगले पाहिजे, यासाठी योग्य नियोजन, पाणीपुरवठा आणि नियमित देखभाल आवश्यक आहे. या मोहिमेमुळे महापालिकेचा नावलौकिक वाढेल आणि भविष्यात अहिल्यानगर शहर 'ग्रीन सिटी' म्हणून राज्यात ओळखले जाईल.

या मोहिमेअंतर्गत शहरात विविध प्रकारची सावलीची, फळझाडे, औषधी वनस्पती आणि पर्यावरणपूरक वृक्ष मोठ्या प्रमाणात लावण्यात येणार असून त्यांचे संवर्धन करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा कार्यरत राहणार आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीलाच वृक्षारोपण मोहिमेला प्रत्यक्ष प्रारंभ होणार असून प्रशासनाने त्यासाठी सर्वंकष नियोजन सुरू केले आहे.

'ग्रीन सिटी' उपक्रमामुळे शहराच्या पर्यावरणीय विकासाला नवी दिशा मिळणार असून येणाऱ्या पिढ्यांसाठी स्वच्छ, हरित आणि निरोगी अहिल्यानगर घडविण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

## नियमबाह्य पद्धतीने सभासदत्व नाकारणाऱ्या मर्चंटस बँकेला हायकोर्टाचा दणका

**राजमल मुनोत यांना सभासदत्व बहाल करण्याचे आदेश**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सहकार कायद्यानुसार सर्व तरतुदींचे पालन करीत सभासदत्वासाठी केलेला अर्ज नामंजूर करणाऱ्या अहमदनगर मर्चंटस को ऑपरेटिव्ह बँकेला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दणका दिला आहे. बँकेचे सभासदत्व मिळण्यासाठी अर्ज करणाऱ्या राजमल बंकटलाल मुनोत (रा. आगरकर मळा, अहिल्या नगर) यांना सभासदत्व बहाल करण्याचे आदेश खंडपीठाने दिले आहेत. या प्रकरणात राजमल मुनोत यांच्या वतीने ॲड. अभय ओस्तवाल यांनी प्रभावी युक्तिवाद केला. हा युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने बँकेने सभासदत्व नाकारण्यासाठी दिलेली कारणे अग्राह्य ठरवली.

याबाबत अधिक माहिती अशी की, राजमल बंकटलाल मुनोत हे मर्चंटस बँकेचे खातेदार व ठेवीदार असून त्यांनी रितसर शुल्क भरून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम २३ अन्वये बँकेच्या सभासदत्वासाठी अर्ज दाखल केला होता. सदर अर्ज बँकेच्या संचालक मंडळाच्या बैठकीत नामंजूर करण्यात आला.सदर निर्णयाविरुद्ध राजमल मुनोत यांनी सहकार आयुक्त कार्यालयाकडे अपिल दाखल केले. सहकार आयुक्त यांनी सुनावणी अंती मुनोत यांना सभासदत्व देण्याचे आदेश २५.१०.२०१६ रोजी दिले होते. सदर आदेशा विरोधात याविरोधात बँकेने सन २०१७ मध्ये सहकार मंत्र्यांकडे अपिल केले होते. बँकेचे पोटनियम व कायदा असताना सहकार मंत्र्यांनी बँकेचे बाजूने २०.०३.२०१८ रोजी निकाल दिला. या निकाला विरोधात राजमल मुनोत यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात ॲड. अभय ओस्तवाल यांच्या यांच्या मार्फत

याचिका दाखल केली. त्यावर सुनावणी होऊन दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकून माननीय न्या. ठोंबरे यांनी १८ एप्रिल २०२६ रोजी निकाल देत राजमल मुनोत यांना सभासदत्व देण्याचे आदेश मर्चंटस बँकेला दिले.

या निकालावर बोलताना राजमल मुनोत यांनी सांगितले की, एखाद्या पात्र व्यक्तीला कायद्याने सभासदत्व मिळण्याचा हक्क मर्चंटस बँकेचे चेअरमन व संचालक मंडळ, सीईओ कायदा पायदळी तुडवून नाकारत आहेत. हायकोर्टाचा निकाल बँकेला मिळालेली चपराक आहे. या प्रकरणात बँकेने वकिलावर लाखो रुपये खर्च केले आहेत. सदरचे खर्च झालेले पैसे चेअरमन, संचालक मंडळ व सीईओ यांचे कडून वसूल करावेत अशी मागणी राजमल मुनोत यांनी केली आहे.

या निकालाची माहिती बँकेचे जागृत सभासद व सहकार कायद्याचे अभ्यासक राजेंद्र चोपडा यांना माहिती झाल्यावर त्यांनी म्हटले की, २५ ते ३० लाख रुपये वार्षिक पगार घेऊन मर्चंटस बँकेचे

सीईओ सुनील पुराणिक यांना कायद्याचा अभ्यास, पोटनियम माहिती नसतील तर त्यांनी नोकरी सोडून द्यावी किंवा त्यांना काढून टाकावे. गलेलठ्ठ पगार घेणाऱ्या सीईओ पुराणिक यांनी संचालक मंडळ व चेअरमन यांना खरी कायदेशीर वस्तुस्थिती सांगितली पाहिजे. पण अशा पद्धतीच्या कायद्याचा अभ्यास नसेल तर ▪ पान ४ वर

## संभाव्य पूरपरिस्थितीचे संकट टाळण्यासाठी प्रभाग १७ मध्ये पावसाळ्यापूर्वी नालेसफाई करा

**नगरसेवक मयूर बांगरे यांची आयुक्तांकडे मागणी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** प्रभाग सतरामध्ये दरवर्षी निर्माण होत असलेल्या पूरपरिस्थितीच्या पार्श्वभूमीवर यंदा पावसाळ्यापूर्वी नालेसफाईची कामे करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी नगरसेवक मयूर बांगरे यांनी आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात बांगरे यांनी म्हटले आहे की, महापालिका हद्दीतील प्रभाग क्र. १७ मध्ये मागील ३–४ वर्षांपासून पावसाळ्यात गंभीर पूरस्थिती निर्माण होत असून, नागरिकांच्या घरात २ ते ३ फूट पाणी शिरते. ही अत्यंत गंभीर बाब असून प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात प्रत्येक वर्षी पावसाळ्यात त्रास सहन करावा लागत आहे. या प्रभागात केवळ एक–दोन सफाई कर्मचारी (चेंबर) कार्यरत असल्यामुळे नालेसफाईचे काम अत्यंत अपुरे व ढिसाळ स्वरूपात होत आहे. ही परिस्थिती तात्काळ बदलणे अत्यावश्यक असून, संबंधित यंत्रणेस कठोर निर्देश देऊन पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात यावे, अशी मागणी बांगरे यांनी केली आहे.

### सीना नदीकाठच्या भागांमध्ये परिस्थिती आहे चिंताजनक

प्रभागातील विशेषतः सीना नदीकाठच्या भागांमध्ये पावसाळ्यात परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. त्यात मल्हार चौकरेल्वे स्टेशन परिसर, आदर्श गौतमनगर / रोहिदासवाडी, कायनेटिक चौक परिसर तसेच अरणगाव रोड परिसर (सुभद्रानगर, समर्थनगर, हनुमाननगर, इंदिरानगर), केडगाव परिसर (नवीन विकासित भाग व जुने गाव) तसेच लोंढे मळा बायपास परिसर येथे मुख्य ओढे व अंतर्गत ड्रेनेज लाईनची तात्काळ व सखोल सफाई करणे अत्यंत गरजेचे आहे, असे निवेदनात म्हटले आहे.

### नालेसफाई योग्य पद्धतीने होत नसल्यामुळेच पूरस्थिती

या भागात नालेसफाई वेळेत व योग्य पद्धतीने न केल्यामुळेच दरवर्षी पूरस्थिती निर्माण होत असून, नागरिकांच्या जीवित व मालमत्तेला गंभीर धोका निर्माण होत आहे. ही बाब प्रशासनासाठी अत्यंत लज्जास्पद असून, याकडे दुर्लक्ष करणे अजिबात सहन केले जाणार नाही. म्हणूनच, पावसाळा सुरू होण्यापूर्वी तात्काळ सर्व संबंधित भागांमध्ये नालेसफाई पूर्ण करून आवश्यक ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात यावी. अन्यथा, हीच परिस्थिती उद्भवल्यास नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल व त्यास सर्वस्वी मनपा प्रशासन जबाबदार राहील, अशा इशाराही नगरसेवक बांगरे यांनी दिला आहे.

## इंदोरीकर महाराजांच्या मुलीच्या लग्नात चेन स्नॅचिंग करणाऱ्यांना दोघांना बेड्या

**एलसीबीच्या कारवाईत १ लाख ९० हजारांचा मुद्देमाल हस्तगत**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सुप्रसिद्ध कीर्तनकार इंदोरीकर महाराज यांच्या मुलीच्या संगननेर येथे पार पडलेल्या शाही विवाह सोहळ्यात चेन स्नॅचिंग करणाऱ्या दोन आरोपींना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने जेरबंद केले आहे. सागर सुरेश कांबळे (वय–३२ वर्षे, रा. रमानगर वार्ड नं.०१ श्रीरामपूर) व बबलू उर्फ अब्दुल इब्राहिम पिंजारी (वय–३६ वर्षे, रा. वार्ड नं.०२ श्रीरामपूर) अशी अटक आरोपींची नावे असून, त्यांच्याकडून २ लाखा ९० हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे, तर त्यांचे दोन साथीदार फरार आहेत.

इंदोरीकर महाराज यांच्या मुलीच्या विवाहास मुख्यमंत्री–उपमुख्यमंत्र्यांसह अनेक मान्यवरांनी हजेरी लावली. या ठिकाणी आयोजित ध्वजारोहण कार्यक्रमावेळी ▪ पान ४ वर

## जामखेड नगरपरिषदेचे दोन कर्मचारी तीन हजाराची लाच घेताना रंगेहाथ पकडले

**जामखेड तालुक्यात एकच खळबळ**

**जाकीर शेख**

**दैनिक आकर्षण । अहिल्यानगर–** जामखेड नगरपरिषदकडून मुलगा व मुलगी जन्म दाखला घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे जोडून नोव्हेंबर २०२५ मध्ये अर्जाद्वारे मागणी केली होती. तेव्हा दोन्ही दाखल्याचे तीन हजार रुपये द्या अशी मागणी केली होती. आज ६ मे रोजी जन्मदाखले देताना तीन हजार रुपयांची लाच घेताना जामखेड नगरपरिषदेचे दोन कर्मचारी रंगेहाथ पकडले यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

तक्रारदार यांनी नोव्हेंबर २०२५ मध्ये जामखेड नगरपरिषदेकडे अर्जाद्वारे मुलगा व मुलगी यांच्या जन्म दाखल्याची योग्य कागदपत्रे जोडून मागणी केली होती मात्र एका दाखल्याचे १५०० रूपये असे दोन दाखल्याचे तीन हजार रुपयांची लाच घेताना नगरपरिषद कर्मचारी आरोपी १) अभिजीत




जालिम भैसडे, वय–३९ वर्षे, पद– लिपिक, जन्म मृत्यु नोंदणीविभाग, नगरपरिषद जामखेड, रा. तपनेश्वर गल्ली, मारूती मंदिरासमोर, जामखेड, ता.जामखेड, जि. अहिल्यानगर

२) अहमद इलियास शेख, वय – ४३ वर्षे, पद– मदतनीस, अग्निशामक दल, नगरपरिषद जामखेड, (कंत्राटी ), रा. काझी गल्ली, मस्जिद समोर, खर्डारोड, जामखेड, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर. यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले.

सविस्त माहिती अशी की, तक्रारदार यांनी दिनांक २६/११/२०२५ रोजी जामखेड नगरपरिषद, जामखेड येथे त्यांचा मुलगा व मुलगी यांचे जन्म दाखला मिळणे करीता आवश्यक कागदपत्र जोडुन अर्ज दिला होता व मुलांचा जन्म दाखला मिळणे कामी त्यांनी लोकसेवक भैसडे यांची भेट घेतली होती. त्यावेळी लोकसेवक भैसडे यांनी लोकसेवक शेख यांना संपर्क ▪ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### सोहम रेसिडेन्सी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड



अहिल्यानगर - भिस्तबाग, ढवणवस्ती, तपोवन रोड येथील सोहम रेसिडेन्सी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. यांच्या संचालक मंडळाच्या पदाधिकारी निवडीची सभा नुकतीच उत्साहात पार पडली. निवड प्रक्रियेनुसार चेअरमनपदी किरण साहेबराव म्हस्के, सचिवपदी कविराज चंदर बोटे तर खजिनदारपदी सागर सुनील धर्माधिकारी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. ही सभा निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. सुधीर गणपत शेटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सन २०२६-२०२७ ते २०३१-२०३२ या कालावधीसाठी निवडून आलेल्या संचालक मंडळामधून पदाधिकाऱ्यांची निवड प्रक्रिया नियमानुसार राबविण्यात आली. निवड प्रक्रियेदरम्यान चेअरमन, सचिव व खजिनदार या प्रत्येक पदासाठी प्रत्येकी एकच नामनिर्देशन अर्ज प्राप्त झाल्याने संबंधित उमेदवारांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. ही प्रक्रिया महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम व संबंधित नियमांच्या अधीन राहून पारदर्शकपणे पार पडल्याचे निवडणूक अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. निवडीनंतर सर्व पदाधिकाऱ्यांचे सभासदांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. यावेळी संस्थेचे सर्व संचालक मंडळ उपस्थित होते. नव्याने निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांनी संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी, पारदर्शक कारभारासाठी आणि सभासदांच्या हितासाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला.

### पैठणमध्ये मोकाट कुत्र्यांचा वाढता त्रास; नागरिकांकडून कारवाईची मागणी

पैठण- शहरातील प्रभाग क्र. ०८, कडबी मोहल्ला परिसरात मोकाट कुत्र्यांचा त्रास दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या संदर्भात नगर परिषदेकडे लेखी तक्रार देऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.रिजवान नांदेडकर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, परिसरात मोठ्या प्रमाणावर मोकाट कुत्रे फिरत असून ते नागरिकांच्या सुरक्षिततेस धोका ठरत आहेत. विशेषतः लहान मुले, महिला आणि वृद्धांना बाहेर पडताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. दि. २३ एप्रिल २०२६ रोजी सकाळच्या सुमारास मुमताह शाखेर  टेकडी या नागरिकावर मोकाट कुत्र्यांनी हल्ला केल्याची घटना घडली असून त्यामध्ये ते गंभीर जखमी झाले. अशा घटनांमुळे परिसरात दहशतीचे वातावरण पसरले आहे.या संदर्भात यापूर्वीही नगर परिषदेकडे तक्रार करण्यात आली होती, मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी नाराजी व्यक्त होत आहे.सदर समस्येची गंभीर दखल घेऊन मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

### ज्येष्ठ नागरिक लिलाकांत हरिभाऊ गायकवाड यांचे निधन



अहिल्यानगर- माणिकदौंड येथील ज्येष्ठ नागरिक तथा सामाजिक व कुटुंबवत्सल व्यक्तिमत्त्व असलेले श्री. लिलाकांत हरिभाऊ गायकवाड (वय ७२) यांचे बुधवार दिनांक ६ मे २०२६ रोजी सायंकाळी ९ वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे माणिकदौंड परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. श्री. गायकवाड हे शांत, संयमी आणि मनमिळावू स्वभावासाठी ओळखले जात होते. त्यांनी आपल्या आयुष्यात सामाजिक बांधिलकी जपत विविध कार्यात सक्रिय सहभाग नोंदवला होता. गावातील अनेक उपक्रमांमध्ये त्यांचे मार्गदर्शन लाभत असे. त्यांच्या निधनाने गावातील एक ज्येष्ठ व आदरणीय व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना नागरिकांत व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात कुटुंबीय, नातेवाईक आणि मोठा मित्रपरिवार असा आप्तस्वकीयांचा परिवार आहे. त्यांच्या जाण्याने गायकवाड परिवारासह रोकडे, अभंग, नांगरे, त्रिभुवन, जाधव या परिवारांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.स्वर्गीय गायकवाड यांचा अंत्यसंस्कार माणिकदौंड येथील अमरधाम स्मशानभूमीत करण्यात करण्यात आले.यावेळी विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्ती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रक्त हे मानवनिर्मित असल्याने प्रत्येकाने रक्तदानाचा संकल्प करावा- सागरनंद गिरीजी महाराज



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. रक्तदानाविषयी जनजागृती होणे आवश्यक आहे.प्रत्येकाने वर्षातून एकदा तरी रक्तदान करावे. सध्या सर्वत्र रक्ताचा तुटवडा होत असल्याने रुग्णांसाठी रक्त मिळविणे ही एक समस्या झाली आहे. रक्त कोणत्याही फॅक्टरी तयार होत नसल्याने व रक्त हे मानवनिर्मित असल्याने प्रत्येकाने रक्तदानाचा संकल्प करावा.तसेच पर्यावरणाच्या रक्षणासाठी बेलवृक्षाचे रोपण करावे. असे प्रतिपादन सागर नंदगिरी जी महाराज गुरु बहुरुपी जनार्दन स्वामी महाराज यांनी केले आहे.

बेलवृक्ष बाबा चैतन्य स्वामी सागरनंद गिरी जी महाराज गुरु बहुरुपी जनार्दन स्वामी महाराज यांनी अनेक वेळा रक्तदान केले आहे. श्रीक्षेत्र वृध्देश्वर येथे सागर नंदगिरी महाराज यांनी रक्तदान केले.

सध्या सर्वत्र रक्ताचा तुटवडा आहे.हे लक्षात आल्यानंतर रा.स्व.संघ संचालित जनकल्याण रक्तकेंद्राला सदिच्छा भेट दिली व रक्तदान शिबिराचे आयोजन करणार असल्याचे सांगितले. यावेळी रक्त केंद्राचे प्रशासकीय अधिकारी सागर उंडे,अकाउंट अधिकारी गजेंद्र सोनवणे,जनसंपर्क अधिकारी विलास मढीकर,डॉ.सौ.देशपांडे यांनी प्रशस्तीपत्रक देऊन सागरनंद गिरी जी महाराज यांचा सत्कार केला.

वणवा रोखा, सृष्टी वाचवा!

# निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे जिल्हाधिकाऱ्यांना साकडे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** निसर्ग वाचला तरच मानवजात वाचेल'' हा केवळ मंत्र नसून ती काळाची गरज आहे, असा आर्त साद घालत निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाने प्रशासनाचे दार ठोठावले आहे. उन्हाळ्याच्या तडाख्याने होरपळणाऱ्या रानावनात सध्या मानवनिर्मित वणव्यांचे अक्राळविक्राळ रूप पाहायला मिळत असून, याविरोधात प्रशासनाने पर्यावरण संरक्षण कायद्याचा बडगा उचलावा, या मागणीसाठी आज जिल्हाधिकारी कार्यालय व पोलीस अधीक्षक कार्यालयात संवेदनशील सादरीकरण करण्यात आले.

वणवा: केवळ आग नव्हे, तर जैवविविधतेचा नरसंहार

गेल्या चार दशकांपासून पर्यावरण चळवळीत सक्रिय असलेल्या या मंडळाने निवेदनात नमूद केले की, वणवा म्हणजे केवळ झाडे जळणे नव्हे, तर त्यासोबत त्या परिसरातील दुर्मिळ वनौषधी, मुके प्राणी, पक्षी आणि त्यांच्या घरट्यांचा होणारा अमानुष नरसंहार आहे. वाढते तापमान आणि पावसाचे बिघडलेले चक्र हे या वणव्यांचेच फलित असल्याचे सांगत, मंडळाने प्रशासनाला आरसा दाखवण्याचे काम केले आहे.

केवळ निवेदन देऊन न थांबता, मंडळाने प्रशासनासमोर ५ कलमी कृती आराखडा मांडला आहे. यामध्ये वनक्षेत्रात फायर लाईन्स तयार करणे, उपग्रह तंत्रज्ञानाचा ( ) वापर करून त्वरित प्रतिसाद यंत्रणा उभारणे आणि वणवा लावणाऱ्या समाजकंटकांवर कठोर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची आग्रही मागणी करण्यात आली आहे.

हे निवेदन देताना निसर्ग व पर्यावरण क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये मंडळाचे राज्य अध्यक्ष प्रमोद मोरे, कायदेशीर सल्लागार सुरेश लगड,कार्याध्यक्ष छायाताई राजपूत, प्रसिद्धी प्रमुख महेश पाडेकर, सचिव डॉ.अनिल लोखंडे, जिल्हाध्यक्ष तुकाराम अडसूळ,डॉ.बबन जाधव,तसेच चंद्रशेखर हासे, विजय पांडे, शरद पवार, अनिल धीवर आदी पदाधिकाऱ्यांचा समावेश होता.
यावेळी बोलताना अध्यक्ष प्रमोद मोरे म्हणाले की, ''प्रशासनाने आता कागदी घोडे नाचवण्यापेक्षा प्रत्यक्ष जमिनीवर उतरून कृती करण्याची वेळ आली आहे. जर ही वनसंपदा राखता आली नाही, तर येणाऱ्या पिढ्यांना आपण केवळ राखेचा डोंगर वारसा म्हणून देऊ.''

# अहमदनगर महाविद्यालयाचे १२ वी बोर्डाच्या परीक्षेत यश

**सायन्स विभागाचा ९१%, कॉमर्स विभागाचा ८५% आणि आर्ट्स विभागाचा ७०% निकाल**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** नुकत्याच झालेल्या इयत्ता बारावीच्या फेब्रुवारी-मार्च २०२६ परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. अहमदनगर महाविद्यालयाच्या सायन्स विभागाचा निकाल ९१%, तर कॉमर्स विभागाचा ८५% आणि आर्ट्स विभागाचा ७०% निकाल लागला आहे. विद्यार्थ्यांनी परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

यामध्ये विज्ञान शाखेत अनुष्का रंजीत सोज्वळ हिने ८०.५०% गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला आहे. अनुष्का राम भवनानी हिने ८०.३३% आणि मिहीर बेंजामिन गायकवाड याने ७९.८३% गुण मिळवून अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविले आहेत.

वाणिज्य शाखेत अरमान अली सोहेल अली सय्यद याने ८९.१७% गुण मिळवून महाविद्यालयात तसेच वाणिज्य शाखेत प्रथम येण्याचा मान मिळविला आहे. तर ध्रुव महेंद्र खैरनार याने ८५% आणि प्राप्ती यशवंत क्षीरसागर हिने ८४.३३% गुण मिळवून वाणिज्य शाखेत अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविले आहेत.

कला शाखेत माही इम्रान तांबोळी हिने ८७% गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला, तर उर्वशी रामानंद शर्मा हिने ८५.६७% आणि डोरा विक्रम बार्णबस हिने ८४.१७% गुण मिळवून अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविले आहेत.

बी.पी.एच.ई. शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर. जे. बार्णबस व सचिव विशाल बार्णबस यांच्या मार्गदर्शनानुसार महाविद्यालयाच्या आवारात या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अभिजीत कुलकर्णी, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रतुल कसोटे, तसेच पर्यवेक्षिका एस. टी. जाधव मॅडम उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना प्रभारी प्राचार्य डॉ. अभिजीत कुलकर्णी म्हणाले की, कनिष्ठ महाविद्यालयातर्फे घेतल्या जाणाऱ्या सर्व प्रकल्पांना प्रतिसाद देऊन विद्यार्थ्यांनी मेहनत आणि कष्टाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांची केवळ शैक्षणिक गुणवत्ता न पाहता त्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणून देशासाठी आदर्श नागरिक बनविण्याचे काम केले गेले पाहिजे आणि त्याकडे महाविद्यालयाचा नेहमीच कल असतो. विद्यार्थ्यांच्या यशाचे श्रेय त्यांच्या मेहनतीबरोबरच पालक आणि शिक्षकांनाही देत, हे एक सामूहिक यश असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# आयटीआय परिसरात चक्री जुगाराचा उच्छाद मारामारीच्या घटनांनी विद्यार्थ्यांमध्ये भीती

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण-** शहरातील आयटीआय परिसरात सध्या मोठ्या प्रमाणावर चक्री जुगाराच्या अड्ड्यांचा उच्छाद वाढला असून, या ठिकाणी नुकतीच मारामारी झाल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकारामुळे परिसरातील नागरिकांमध्ये तसेच विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



आयटीआय परिसरात दररोज विद्यार्थी-विद्यार्थिनींची मोठ्या प्रमाणावर ये-जा असते. मात्र याच परिसरात काही जण खुलेआम चक्री जुगार खेळताना दिसत असून, अनेकदा दारूच्या नशेत धिंगाणा घालत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, या ठिकाणी वारंवार भांडणे व गोंधळाच्या घटना घडत असून, त्याचा विपरीत परिणाम विद्यार्थ्यांवर होत आहे. विशेषतः मुलींच्या सुरक्षिततेबाबत पालकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

या पार्श्वभूमीवर आयटीआय परिसरातील चक्री जुगाराचे अड्डे तात्काळ बंद करण्यात यावेत व संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. तसेच पैठण पोलीस ठाण्याने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन नियमित गस्त वाढवावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# शहरात 'ॲनिमल' झाला हाऊसफुल; सिद्धार्थ जाधव यांच्या अभिनयाची जादू

**नाटकातून 'दत्तू'चा संघर्ष रंगमंचावर जिवंत । मुंबईच्या स्वप्नांचा प्रवास; संघर्ष व जीवनाचे प्रतिबिंब**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** शहरातील नाट्यप्रेमींसाठी खास ठरलेला कबीर इव्हेंट्स आयोजित 'ॲनिमल' हा बहुचर्चित मराठी नाटकाचा प्रयोग सावेडी येथील माऊली सभागृहात हाऊसफुल ठरला. सिनेअभिनेता सिद्धार्थ जाधव यांच्या दमदार अभिनयाला नगरकरांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त दाद दिली.

अश्वमी थिएटर्स व ताराराम प्रॉडक्शन निर्मित या नाटकाचे लेखन व दिग्दर्शन महेश मांजरेकर यांनी केले आहे. नाटकातून मुंबईतील चंदेरी दुनियेत आपले नशीब आजमावण्यासाठी आलेल्या 'दत्तू' या तरुणाचा संघर्षमय प्रवास प्रभावीपणे उलगडण्यात आला आहे. गावातून अभिनेता होण्याचे स्वप्न घेऊन मुंबईत आलेल्या दत्तूच्या आयुष्यातील निरागसता, स्वप्ने, अपयश आणि वास्तवाचा सामना यांचा भावनिक पट नाटकातून रंगवण्यात आला आहे. दत्तूची प्रमुख भूमिका साकारणाऱ्या सिद्धार्थ जाधव यांनी शब्दोच्चार, देहबोली आणि भावनिक चढ-उतार यांमधून पात्राला जिवंत केले. त्यांच्या विनोदी प्रसंगांमुळे सभागृहात हास्याचा कल्लोळ उसळला, तर भावनिक प्रसंगांनी प्रेक्षकांना अंतर्मुख केले.

नाटकाचे वैशिष्ट्य म्हणजे इतर पात्रे प्रामुख्याने मूक असूनही, नेपथ्य, प्रकाशयोजना, संगीत आणि हावभाव यांच्या माध्यमातून कथानक अधिक प्रभावी बनवण्यात आले आहे. दत्तूच्या आयुष्यातील प्रत्येक टप्पा  ऑडिशनची धडपड, स्वप्नांची आस, अपयशाचा स्वीकार आणि कुटुंबीयांची आठवण अत्यंत वास्तववादी पद्धतीने साकारली आहे.

'ॲनिमल' हे नाटक एका सर्वसामान्य तरुणाच्या स्वप्नांची आणि संघर्षाची कहाणी आहे. 'दत्तू शिंदे' हा खेड्यातून आलेला, मनाने निष्पाप पण जिद्दी तरुण मुंबईत अभिनेता होण्याचे स्वप्न घेऊन येतो. मात्र, चंदेरी दुनियेतील वास्तव, स्पर्धा, नकार आणि मानसिक ताण



यांचा सामना करताना त्याचे स्वप्न हळूहळू मृगजळ ठरते.

या नाटकातून समाजातील काही ज्वलंत प्रश्नांवरही भाष्य करण्यात आले. महिलांवरील अत्याचार, लहान मुलींवरील बलात्कार यांसारख्या घटनांच्या पार्श्वभूमीवर माणसातील क्रौर्य अधोरेखित करण्यात आले, तर जनावरांमध्ये जात-धर्म नसतो पण माणूस मात्र विभाजनात अडकला आहे, हा संदेशही प्रभावीपणे देण्यात आला. कोरोना काळातील प्रसंग, तसेच आंतरराष्ट्रीय घडामोडींवर हलक्याफुलक्या शैलीत भाष्य करून प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडण्यात आले. नाटकात सिद्धार्थ जाधव यांच्यासह सिद्धार्थ साळवी, पंकज पंचारिया, हृतिका अर्जुन, आदित्य पंढरे, संदीप जुवाटकर यांच्या मूक भूमिका प्रभावी ठरल्या. विशेषतः दत्तूचा 'मूक मित्र' ही भूमिका प्रेक्षकांच्या लक्षात राहणारी ठरली.

मध्यांतरावेळी कबीर इव्हेंट्सच्या वतीने संदीप कुसळकर यांनी सिद्धार्थ जाधव यांचे स्वागत केले. तसेच मुख्य प्रायोजक शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाऊंडेशनचे नरेंद्र फिरोदिया आणि सहप्रायोजक रोझ गोल्ड-ब्रम्हाभोजचे लौकिक शिंगवी यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी संजय गुगळे यांचे सहकार्य लाभले असून, सुरज ढवळे, राम गोल्हार, पृथ्वीराज गोपाळघरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

संदीप कुसळकर यांनी शहरात दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रम देण्याचा प्रयत्न कायम ठेवणार असल्याचे सांगितले. यापूर्वीही विविध दिग्गज कलाकारांचे कार्यक्रम यशस्वीपणे सादर करण्यात आले असून, 'ॲनिमल'लाही प्रेक्षकांचा भरघोस प्रतिसाद मिळाल्याचे स्पष्ट केले.

यावेळी सिद्धार्थ जाधव यांनी नगरकरांच्या नाट्यप्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत, ''मराठी नाटकावरचे प्रेम आणि प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून मी भारावलो आहे,'' असे सांगितले.
नाटकाचे निर्माता सिद्धार्थ जाधव असून, नेपथ्य संदेश बेंद्रे, प्रकाशयोजना श्याम चव्हाण, सहाय्यक दिग्दर्शक सूरज कांबळे, ध्वनी आरेखन प्रथमेश भोवड, वेशभूषा सायली पांगारे, रंगभूषा विपिन येरुणकर, सूत्रधार गोट्या सावंत, प्रकाशयोजना सामग्री रत्नकांत जगताप, संगीत संयोजक संग्राम लवटे, व्यवस्थापन सहाय्यक विलास दाते व राजेश चौधरी, तर नेपथ्य निर्मिती सुशील पांचाळ यांनी सांभाळली.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर - ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर- ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक - विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक - तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)
The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### अहिल्यानगर रेल्वे स्टेशनवरून ५० वर्षीय व्यक्ती बेपत्ता



अहिल्यानगर- शनी शिंगणापूर येथे दर्शनासाठी आलेल्या पंजाबमधील एका ५० वर्षीय व्यक्तीचा अहिल्यानगर रेल्वे स्टेशनवरून बेपत्ता झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याबाबत कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. याबाबत मिळालेली माहिती अशी की, पंजाब राज्यातील फाजिल्का तालुक्यातील निहाल खेडा येथील रहिवासी राजिंदर दीवानचंद सांगवाल (वय ३२, व्यवसाय मजुरी) हे आपल्या पत्नी पिंकी व शेजारी मदन मतुराम सोलंकी (वय अंदाजे ५०) यांच्यासह दि. ३० एप्रिल २०२६ रोजी शनी शिंगणापूर येथे दर्शनासाठी आले होते. दि. १ मे २०२६ रोजी दुपारी दर्शन आटोपून ते तिघेही अहिल्यानगर रेल्वे स्टेशनवर पंजाबकडे जाणाऱ्या ट्रेनची वाट पाहत होते. रात्री सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास ट्रेन आल्यावर मोठ्या गर्दीत ते ट्रेनमध्ये चढले. मात्र, ट्रेन सुरू झाल्यानंतर काही वेळाने मदन सोलंकी हे दिसेनासे झाल्याचे सांगवाल यांच्या लक्षात आले प्रवाशांकडे चौकशी केली असता काहींनी संबंधित व्यक्ती ट्रेन सुटत असताना खाली उतरल्याचे सांगितले. पुढील स्टेशनवर उतरून सांगवाल दाम्पत्य पुन्हा अहिल्यानगर येथे आले व शोध घेतला. रेल्वे स्टेशनवरील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता मदन सोलंकी हे मुख्य प्रवेशद्वारातून बाहेर जाताना दिसून आले. यानंतर सांगवाल दाम्पत्याने रेल्वे परिसर, शहर व नातेवाईकांकडे शोध घेतला, मात्र ते कुठेही आढळून आले नाहीत. त्यामुळे ते कोणासही न सांगता निघून गेल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. बेपत्ता व्यक्तीचे वर्णन, नाव मदन मतुराम सोलंकी, वय अंदाजे ५० वर्षे, उंची ५ फूट १० इंच, रंग गोरा, पेहराव निळ्या रंगाचा कुर्ता व पायजमा चेहरा उभा, नाक सरळ, केस काळे, डोळे काळे या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून पोलीसांकडून पुढील तपास सुरू आहे. नागरिकांनी संबंधित व्यक्तीबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास तात्काळ पोलीसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### डोंगरे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न पुरस्कार प्रदान

अहिल्यानगर - सोजाई आदिवासी महिला विकास फाउंडेशनच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. आळंदी रोड, चरहोली बुद्रुक (जि. पुणे) येथे हा सन्मान सोहळा पार पडला. दिघी येथील पोलीस उपनिरीक्षक प्रमोद वाघ यांच्या हस्ते डोंगरे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मानपत्र व स्मृतीचिन्ह पुरस्काराचे स्वरुप होते. या कार्यक्रमाप्रसंगी राष्ट्रपती पोलीस पदक विजेते सिताराम नरके, कार्यक्रमाचे अध्यक्ष उमेश चव्हाण, फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. प्रशांत चव्हाण, सचिव जयश्री सोनवणे, गझलकार रज्जाक शेख, आनंदा साळवे, अभिनेते अतुल गुंजाळ आदी उपस्थित होते. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तसेच ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी नगर तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात ग्रामीण भागात विविध क्षेत्रांत सातत्यपूर्ण सामाजिक कार्य उभारले आहे. संस्थेच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, साहित्य व धार्मिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. ग्रामीण भागात वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनासाठी विविध उपक्रम राबवून पर्यावरण संवर्धनाबाबत व्यापक जनजागृती निर्माण केली आहे. स्त्री जन्माचे स्वागत, स्वच्छता अभियान, महिला सक्षमीकरण, मतदार जागृती, जलसंधारण जनजागृती मोहीम, रक्तदान शिबिरे यांसारखे उपक्रम व्यापक स्वरूपात राबविले जात आहेत. युवकांसाठी व्यसनमुक्ती संदर्भातील कार्यक्रम, तसेच गावपातळीवर आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून ग्रामस्थांना आरोग्यसेवा देण्याचे कार्यही संस्थेमार्फत सुरू आहे. विविध स्पर्धा, महिला बचत गट मेळावे, युवा संमेलनांच्या आयोजनातून समाजाला सकारात्मक दिशा देण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात आहे. साहित्य चळवळीला चालना देण्यासाठी पै. नाना डोंगरे यांनी आठ राज्यस्तरीय काव्य संमेलने तसेच चार ग्रामीण मराठी साहित्य संमेलने यशस्वीपणे आयोजित केली आहेत. त्यांच्या या बहुआयामी सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा रस्ता रोको आंदोलन

## राजदेव यांचे जिल्हा दंडाधिकाऱ्यांना निवेदन



> **''कांदा शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी तात्काळ उपाययोजना आवश्यक आहेत. आम्ही रस्ता रोको करणार आहोत, पण शासनाने जबाबदारी घेतली तर आंदोलन मागे घेतले जाईल. शेतकरी हा राष्ट्राचा कणा आहे, त्याला कोणतीही अडचण येऊ नये यासाठी आम्ही लढा देत राहू.''**
>
> **रवींद्र राजदेव,**
> **राष्ट्रवादी काँग्रेस नेते**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** १५ मे २०२६ रोजी कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्याच्या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते रवींद्र राजदेव तसेच गटाच्या नेत्या सोनिया ताई राजदेव यांच्या नेतृत्वाखाली नगर-कल्याण महामार्गावरील टाकळी ढोकेश्वर येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन अपर जिल्हा दंडाधिकारी श्री. दादासाहेब गीते यांना देण्यात आले. यावेळी राजदेव यांनी शेतकऱ्यांच्या विविध समस्या आणि आंदोलनाची रूपरेषा याबाबत अप्पर जिल्हा दंडाधिकारी श्री दादासाहेब गीते यांच्याशी सविस्तर चर्चा केली.

निवेदन देताना रवींद्र राजदेव यांनी सांगितले की, गेल्या काही महिन्यांपासून कांदा उत्पादक शेतकऱ्यांना प्रचंड आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. बाजारात कांद्याचे भाव अतिशय घसरले असून, उत्पादन खर्चही वाढल्याने शेतकऱ्यांची दशा बिकट झाली आहे. ''शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमत (एमएसपी) देण्यात यावी, निर्यातीवर असलेली बंदी हटवावी, कोल्ड स्टोरेज सुविधा वाढवाव्यात आणि कांदा निर्यातीसाठी सरकारी पातळीवर प्रयत्न करावेत,'' अशा प्रमुख मागण्यांचा समावेश निवेदनात करण्यात आला.

कांद्याच्या प्रमुख समस्या:

महाराष्ट्रातील नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सोलापूरसह अनेक जिल्ह्यांमध्ये कांदा हा प्रमुख नगदी पिक आहे. यंदा चांगल्या पावसामुळे उत्पादन वाढले, परंतु बाजारपेठेत मागणी आणि पुरवठा यातील तफावतीमुळे भाव कोसळले आहेत. शेतकऱ्यांना उत्पादन खर्च (बी-बियाणे, खत, कीटकनाशके, मजुरी, वाहतूक) भरून निघत नाही. सध्याचे सरासरी भाव ८०० ते १५०० रुपये प्रति क्विंटल एवढेच राहिले आहेत, जो उत्पादन खर्चाच्या तुलनेत नगण्य आहे.

शेतकऱ्यांच्या मागण्या खालीलप्रमाणे आहेत: कांद्यासाठी हमी भाव जाहीर करणे. निर्यात बंदी तात्काळ उठवणे आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत प्रवेश मिळवणे. जिल्ह्यांतर्गत अधिक चांगल्या कोल्ड स्टोरेज सुविधा उपलब्ध करणे. नुकसान भरपाईसाठी विशेष पॅकेज जाहीर करणे. शेतकऱ्यांना थेट बाजारपेठेशी जोडण्यासाठी ई-नाम आणि इतर प्लॅटफॉर्मचा प्रभावी वापर करणे. कांदा प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देऊन मूल्यवृद्धी करणे.

रवींद्र राजदेव यांनी अपर जिल्हा दंडाधिकारी श्री. दादासाहेब गीते यांच्याशी सुमारे ४० मिनिटे चर्चा केली. यावेळी राजदेव यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या. श्री. गीते यांनी शेतकऱ्यांच्या समस्या राज्य शासनाकडे तत्काळ पाठवण्याचे आश्वासन दिले. ''शासन स्तरावर योग्य तो विचार केला जाईल आणि शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील,'' असे त्यांनी सांगितले. आंदोलनात शेकडो शेतकऱ्यांनी सहभाग घेणार असून, महामार्गावरील वाहतूक काही काळ बंद राहण्याची शक्यता आहे. परंतु हा रस्ता रोको अत्यंत शांततेत पार पडणार असल्याचे राजदेव यांनी सांगितले आहे शेतकऱ्यांच्या या आंदोलनाकडे राज्यातील राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात लक्ष लागले आहे.कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या दीर्घकाळ सोडवण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाने समन्वयाने काम करण्याची गरज आहे. अन्यथा येत्या काळात आंदोलने अधिक तीव्र होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## दिल्लीगेट येथे १७ मे रोजी उभारली जाणार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार-शिक्षणाची क्रांतिकारी 'ज्ञानगुढी'

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या नावाखाली होणारे कर्णकर्कश डीजे, ध्वनीप्रदूषण आणि दिखाऊ शक्तिप्रदर्शन यावर कठोर प्रश्न उपस्थित करत महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक निरीक्षण नोंदवले आहे. या निरीक्षणाचे पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेच्या वतीने स्वागत करण्यात आले असून, त्याला ''राष्ट्रीय सलामी'' देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर शहरातील दिल्लीगेट परिसरात रविवार, दि. १७ मे रोजी सकाळी १०.३० वाजता ''ज्ञानगुढी'' उभारण्याचा उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती ज्येष्ठ विधीज्ञ अ‍ॅड. कारभारी गवळी यांनी दिली. ही ज्ञानगुढी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित बौद्धिक आणि वैचारिक चळवळीचे प्रतीक असणार आहे.

न्यायालयाच्या खंडपीठातील मा. न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फलके आणि मा. न्यायमूर्ती निवेदिता पी. मेहता यांनी आपल्या निरीक्षणात स्पष्ट केले की, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बौद्धिक विकास आणि वंचितांचे उत्थान अधिक प्रिय असते.'' हे निरीक्षण केवळ न्यायालयीन टिप्पणी नसून आधुनिक भारताच्या सामाजिक वास्तवाचे प्रतिबिंब असल्याचे मत अ‍ॅड. गवळी यांनी व्यक्त केले.

अ‍ॅड. गवळी पुढे म्हणाले की, उभारण्यात येणारी ''ज्ञानगुढी'' ही डीजे संस्कृती, ध्वनीप्रदूषण, दिखाऊ राजकारण, मानसिक गुलामगिरी, अज्ञान आणि अंधानुकरणाविरोधातील वैचारिक प्रतिकाराचे प्रतीक असेल. ही गुढी विवेक, संविधानिक मूल्ये, सामाजिक जबाबदारी आणि बौद्धिक क्रांती यांचे प्रतीक म्हणून उभारली जाणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला संविधान, वैज्ञानिक दृष्टिकोन, शिक्षणाची क्रांती, स्वाभिमान आणि विचारस्वातंत्र्य दिले. त्यांनी ''शिका, संघटित व्हा, संघर्ष करा'' हा मूलमंत्र दिला. त्यांनी कधीही गोंधळ, ध्वनीप्रदूषण किंवा दिखाऊ शक्तिप्रदर्शनाचा पुरस्कार केला नाही, असे अधोरेखित करत अ‍ॅड. गवळी म्हणाले की, आज अनेक ठिकाणी जयंती उत्सव हे डीजे, फटाके, रस्ते बंद, वाहतूक कोंडी आणि सोशल मीडियावरील प्रसिद्धीपुरते मर्यादित होत चालले आहेत.

संघटनेच्या वतीने असेही स्पष्ट करण्यात आले की, न्यायालयाने उपस्थित केलेला प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे ''जर एखादा विद्यार्थी अभ्यास करू शकत नसेल, रुग्ण झोपू शकत नसेल, वृद्ध त्रस्त होत असतील, तर हा कोणता सामाजिक न्याय?''

''ज्ञानगुढी'' म्हणजे वाचनालये आणि अभ्यासिकांची प्रेरणा, संविधान वाचनाचा संदेश, विज्ञाननिष्ठ चर्चा, गरीब विद्यार्थ्यांना मदत आणि जातीय मानसिकतेविरुद्ध वैचारिक लढा, असे या उपक्रमाचे स्वरूप असणार आहे.

''मोठा आवाज म्हणजे मोठा विचार नसतो; डीजे काही तास घुमतो, पण ज्ञान पिढ्यान्पिढ्या घुमत राहते,'' असा संदेश या उपक्रमातून दिला जाणार आहे.

शहरातील सर्व समाजघटकांनी या ऐतिहासिक ''ज्ञानगुढी'' उभारणी कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. हा उपक्रम वैचारिक परिवर्तनाकडे वाटचाल करणारा ऐतिहासिक प्रयत्न असल्याचे मत व्यक्त करण्यात आले आहे.

### अ‍ॅलेक्स कपच्या ८ व्या पर्वाला उत्साहात प्रारंभ

## भुईकोट किल्ल्याच्या मैदानावर रंगतोय फुटबॉलचा थरार



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** फिरोदिया शिवाजियन्स, अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन (ए.डी.एफ.ए.) आणि फर्नांडिस परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या अ‍ॅलेक्स कप या फुटबॉल स्पर्धेच्या ८ व्या पर्वाला नुकतेच प्रारंभ झाले.

स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे संयुक्त सचिव प्रदीप जाधव यांच्या हस्ते तसेच कार्यकारिणी सदस्य राजेंद्र पाटोळे आणि पल्लवी सैंदाणे यांच्या उपस्थित करण्यात आले. यावेळी फिरोदिया शिवाजियन्सच्या गेल्या ३५ वर्षांपासूनच्या जर्सी रंगांचे प्रतीक असलेल्या लाल आणि पांढऱ्या फुगे आकाशात सोडून उद्घाटन करण्यात आले.

ही स्पर्धा स्वर्गीय अ‍ॅलेक्स फर्नांडिस उर्फ ''बाबा'' यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात येत असून, अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनच्या स्थापनेपासून सलग ४५ वर्षे त्यांनी संस्थापक सचिव म्हणून काम पाहिले. अहमदनगर जिल्ह्यात फुटबॉलच्या विकासासाठी त्यांचे योगदान अतुलनीय असून ते कायम स्मरणात राहणार आहे. त्यांच्या स्मरणार्थ ही स्पर्धा घेतली जात आहे.

यंदाच्या स्पर्धेत एकूण १० संघ सहभागी झाले असून, अंतिम सामना ९ मे २०२६ रोजी खेळविण्यात येणार आहे. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी फिरोदिया शिवाजियन्सच्या कोअर कमिटी सदस्यांमध्ये अभिषेक सोनावणे, पल्लवी सैंदाणे, सचिन पात्रे, जेव्हिअर स्वामी आणि राजेश अँथनी परिश्रम घेत आहेत. तसेच वरिष्ठ खेळाडू अभय साळवे आणि मयूर गोरखा यांनीही मोठे योगदान दिले आहे.

ही स्पर्धा मानद सचिव रोनाप फर्नांडिस यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात येत असून जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे सदस्य खालिद सय्यद, व्हिक्टर जोसेफ आणि रिशपाल सिंह परमार यांनीही मोलाचे सहकार्य स्पर्धेसाठी केले आहे.

रंगतदार सलामीचे सामने

सलामीचा सामना फिरोदिया शिवाजीयन्स क्लब विरुध्द सॉकर स्कूल यांच्यात झाला. यामध्ये २-० गोलने फिरोदिया शिवाजीयन्स क्लब विजेता ठरला. प्रतिस्पर्धी संघाला एकही गोल करता आला नाही.

फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमी (अंडर-१५ मुले) विरुध्द युनिटी फुटबॉल क्लब यांच्यात झालेल्या सामना शेवट पर्यंत रंगतदार व अनिर्णित राहिला. शेवटी पेनल्टी शूटआऊटमध्ये ३-२ गोलने फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमीने विजय संपादन केले.

## गवांदे क्लासेसचे तीन विद्यार्थी गणितात राज्यात सर्वप्रथम



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नुकत्याच जाहीर झालेल्या बारावी बोर्ड परीक्षेत गवांदे मॅथ क्लासच्या विद्यार्थ्यांनी गणित विषयात दणदणीत यश संपादन करत राज्यभरात आपला ठसा उमटवला आहे. तीन विद्यार्थी गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून राज्यात सर्वप्रथम येण्याचा मान मिळविला आहे.

मयुरेश शिंदे, प्रणाली कोठुळे आणि श्रद्धा काळे या विद्यार्थिनींनी पैकीच्या पैकी गुण मिळवत राज्यात अव्वल कामगिरी नोंदवली असून क्लासचा नावलौकिक उंचावला आहे. तसेच या परीक्षेत २५ विद्यार्थ्यांनी शंभर पैकी ९० पेक्षा जास्त गुण मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. सदर परीक्षेत ओमकार तापकीर ९९ माऊली खेमनर ९७, कु.साई होळकर ९६, राजदीप मोराळे ९५, गणेश बावणे ९५, श्रेयस दुतारे ९५, अजय शिंगाडे ९५ , शिव चव्हाण ९४ , आदित्य कासार ९४ , वेदांत डमाळे ९४ , ओम ओहळ ९३ , कु. तेजस्विनी आमटे ९२ , कु.नम्रता मस्के ९२ , शिवम वाघ ९१ , कु. दिशा जाधव ९१ , सत्यम पाचपुते ९० , सुयश पंडित ९० , रोहन फाटके ९० , कु.खुशी गुगळे ९० आणि ओंकार जवक ९० तसेच क्लासेसच्या ५७ विद्यार्थ्यांनी ८० पेक्षा जास्त गुण मिळविले आहेत.

म्हणजेच केंद्र सरकारच्या अभियांत्रिकी प्रवेश परीक्षेत गवांदे क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले आहेत सदर परीक्षेत शुभम मस्के ९७.०९ , कु.श्रुती भळगट ९७.०७, प्रणव घुले ९५.४३ , कार्तिक खडके ९४.९० , मयूर पानमंद ९४.४७ , ऋतुराज काकडे ९४.५३ , यश पावडे ९४.३२ , कु. आदिती दासी ९४.३२ , पियुष मेघुडे ९३.०८ , ओंकार तापकीर ९२.७५ ,कु. सृष्टी परदेशी ९१.६० , चैतन्य रोकडे ९१.२७ , वेदांत कोरडे ९०.१२ , कु. संस्कृती वाघ ९०.०४ , हरीश वाघ ९०.०१ , अशा १५ विद्यार्थ्यांनी ९० पेक्षा जास्त गुण मिळविले आहेत. यावर्षी २८ विद्यार्थी () म्हणजेच च्या प्रवेश परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत.

# सावेडीतील महापौर उद्यानात बालगोपालांचा उत्साह ओसंडला

**। माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांच्या समर कॅम्पमध्ये शेकडो विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग**
**। मैदानी खेळ, संस्कार आणि आनंदाची पर्वणी; पालकांकडून उपक्रमाचे कौतुक**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी







**अहिल्यानगर–** सावेडी गावातील महापौर उद्यान परिसर सध्या बालगोपालांच्या आनंदाने आणि उत्साहाने फुलून गेला असून माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या समर कॅम्पला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. उन्हाळ्यातील शालेय सुट्टीत मुलांनी मोबाईल आणिर् टीव्हीपासून दूर जात मैदानी खेळ, संस्कार आणि विविध कला उपक्रमांकडे वळावे या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या समर कॅम्पमध्ये शेकडो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे.

महापौर उद्यानात सायंकाळ पासूनच बालगोपाळांचा जल्लोष पाहायला मिळत असून विविध खेळ, व्यायाम, योगा, सांस्कृतिक उपक्रम आणि मनोरंजनात्मक स्पर्धांमुळे संपूर्ण परिसर आनंदमय वातावरणाने भारावून गेला आहे. बालकांनी क्रिकेट, कबड्डी, दोरीखेच, लाठीकाठी, जिम्नॅस्टिक, सेल्फ डिफेन्स, एरोबिक्स, योगा अशा विविध खेळांचा मनमुराद आनंद घेतला.

यावेळी माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांनीही बालगोपाळांमध्ये मिसळत खेळांचा आनंद घेतला आणि स्वतःच्या बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. मुलांच्या उत्साहामुळे संपूर्ण महापौर उद्यान गजबजून गेले होते. पालकांनीही या उपक्रमाचे मनापासून कौतुक करत अशा संस्कारक्षम आणि आरोग्यवर्धक उपक्रमांची आजच्या काळात मोठी गरज असल्याची भावना व्यक्त केली.

यावेळी माजी महापौर बाबासाहेब वाकळे म्हणाले की, आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात मुले मोबाईल, व्हिडिओ गेम आणि टीव्हीमध्ये अडकून पडत आहेत. त्यामुळे त्यांचे बालपण हरवत चालले असून मैदानी खेळांपासून ते दूर जात आहेत. यामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. मुलांनी निरोगी, सुदृढ आणि आत्मविश्वासपूर्ण जीवन जगायचे असेल तर त्यांना बालवयातच मैदानी खेळांची आवड निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणूनच या समर कॅम्पच्या माध्यमातून खेळ, संस्कार, कला आणि संस्कृती यांचा सुंदर संगम घडवण्याचा प्रयत्न केला आहे.

ते पुढे म्हणाले की, ''आजचे विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे भविष्य आहेत. मुलांमध्ये नेतृत्वगुण, संघभावना, शिस्त, आत्मविश्वास आणि सकारात्मक विचार निर्माण व्हावेत यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता आहे. खेळामुळे केवळ शरीर मजबूत होत नाही, तर मन देखील सक्षम बनते. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, जिजाऊंचे संस्कार आणि आपल्या संस्कृतीची ओळख मुलांना या शिबिरातून करून दिली जात आहे. मुलांनी अभ्यासाबरोबरच खेळ, कला आणि सामाजिक संस्कार आत्मसात करणे काळाची गरज आहे.

समर कॅम्पमध्ये मुलांना अ‍ॅथलेटिक्स, योगा, रोप मल्लखांब, हॉर्स रायडिंग, जादू प्रयोग, सेल्फ डिफेन्स ट्रेनिंग, संस्कार वर्ग, कथाकथन, मजेदार खेळ, सहल, क्रिकेट, कबड्डी, दांडपट्टा, एरोबिक्स डान्स यांसारख्या विविध उपक्रमांचे प्रशिक्षण दिले जात आहे. तसेच जिजाऊ माता आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित ऐतिहासिक गोष्टी आणि संस्कारांचे धडेही दिले जात आहेत.

यावेळी पालकांनी सांगितले की, ''आजच्या काळात मुलांना चांगले संस्कार, मैदानी खेळ आणि सकारात्मक वातावरण मिळणे अत्यंत गरजेचे आहे.

# महेश लोंढे यांच्या माध्यमातून प्रभागातील प्रश्न सुटणार – पै. सुभाष लोंढे

**। नगर–कल्याण रोड येथील श्रीकृष्ण नगरमध्ये सभामंडपाच्या कामाचे भूमीपूजन**
**। नगरसेवक पै. महेश लोंढे यांच्या पाठपुराव्याने विकास काम मार्गी**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर–कल्याण रोड प्रभाग क्रमांक ९ मधील श्रीकृष्ण नगर येथे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी उपलब्ध करुन दिलेल्या निधीच्या माध्यमातून आमदार संग्राम जगताप आणि भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सभामंडपाच्या कामाचे भूमीपूजन उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते झाले. यावेळी महापालिका स्थायी समितीचे सभापती पै. सुभाष लोंढे, भाजपचे जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, नगरसेवक निखिल वारे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब सानप, अभिजीत बोरुडे, सुषमा गोळे, सुनीता कर्डिले, विशाखा मिसाळ, पल्लवी बुगे, हिराबाई गोरे, लताबाई लोंढे, राधाबाई अंधारे, रंजना ढवळे, सुभद्रा कुकाटे, आशा गोरे, सुनील वाव्हळ, प्रभाकर कोंडा, अशोक बुगे, भगवान ढवळे, आप्पा कदम, खांदवे सर, सखाराम गोरे आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपमहापौर धनंजय जाधव म्हणाले की, महापालिकेत मिळालेल्या बहुमतामुळे शहरात सर्वच प्रभागात विकास कामे झपाट्याने होत आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून निधी देखील उपलब्ध करुन दिला जात आहे. शहरात विकासाची गंगा वाहती झाली आहे. दैनंदिन प्रश्न सोडवण्यासाठी महायुतीचे नगरसेवक कायम तत्पर असून, प्रभाग ९ मध्ये पै. महेश लोंढे यांचे उत्तम प्रकारे विकासकामाचे नियोजन व कार्य सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.

अनिल मोहिते म्हणाले की, श्रीकृष्ण नगर परिसरात चांगले सभामंडप उभारले जात आहे. या सभामंडपाचा स्थानिक नागरिकांना सांस्कृतिक भवन म्हणून उपयोग होणार आहे. आरसीसी बांधकाम असल्याने छोटे–मोठे कार्यक्रम होईल आणि त्यापुढे देखील आणखी मजले उभारून विविध सुविधा निर्माण करता येणार आहे. जनतेने महायुतीला दिलेले बहुमत विकास कामातून उतराई केली जात आहे. विकास कामासाठी राज्य व केंद्र सरकार शहराच्या पाठिशी असल्याचे ते म्हणाले.

पै. सुभाष लोंढे म्हणाले की, राजकारण व समाजकारणाचा वारसा लाभलेले महेश लोफ्लढे यांच्या माध्यमातून प्रभागातील प्रश्न सुटणार आहे. शहरातील मुलभूत प्रश्न लक्षात घेऊन ते सोडविण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहे. शहराच्या विकासासाठी महायुतीच्या माध्यमातून मिळत असलेल्या निधीमुळे विकासकामे झपाट्याने होत असल्याचे त्यांनी सांगितले.


राजकारण व समाजकारणाचे धडे घेऊन पहिल्यांदा नगरसेवक झालेले पै. महेश लोंढे नागरिकांच्या समस्येवर विशेष लक्ष देत आहे. आपल्या कार्यातून त्यांनी विकासकामांद्वारे लोकांमध्ये विश्वास निर्माण केला आहे. एका फोनवर लोकांच्या समस्येसाठी ते धावून येतात, हक्काचा माणूस म्हणून त्यांच्याकडे सर्व नागरिक पाहत असल्याची भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली.

# पुण्यात 'म्हातारा पाऊस आणि थडगं' पुस्तकाचे प्रकाशन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पुण्यातील 'द बॉक्स' येथे रविवारी दि. ३ मे २०२६ रोजी एक साहित्यिक व नाट्यमय सोहळा उत्साहात पार पडला. अहिल्यानगर येथील अभिनेता, दिग्दर्शक आणि लेखक कृष्णा वाळके यांच्या 'म्हातारा पाऊस आणि थडगं' या दोन नाटकाचे पुस्तक स्वरूपात प्रकाशन करण्यात आले. हा क्षण लेखकासाठी विशेष ठरला असून, उपस्थितांमध्येही आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

या कार्यक्रमाला अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे कोषाध्यक्ष सतीश लोटके, अभिनेते नानाभाऊ मोरे आणि निरंजन पेडणेकर यांसारखी मान्यवर मंडळी उपस्थित होती. तसेच लेखकाचे आई–वडील, नातेवाईक आणि नाट्यप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पुस्तकाचे प्रकाशन होत असताना लेखकाच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद आणि समाधान उपस्थितांच्या मनाला स्पर्शून गेला. विशेष म्हणजे हे त्यांचे पहिलेच पुस्तक असल्याने हा सोहळा अधिकच संस्मरणीय ठरला.




हे पुस्तक शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर यांनी प्रकाशित केले आहे.

कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी पुस्तकाविषयी आपले अनुभव मांडत लेखकाला शुभेच्छा दिल्या आणि भविष्यातही असेच दर्जेदार लेखन घडावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

दरम्यान, याच दिवशी 'नाट्यमहोत्सव तुमचा–आमचा' हाही रंगतदार पद्धतीने पार पडला. दिवसभरात पॉपकॉर्न, कॉर्पोरेट कबूतर, भूताचं भविष्य, थडगं आणि लाली अश्या एकूण पाच नाटकांचे सादरीकरण करण्यात आले. प्रत्येक नाटकाला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दिवसभर नाटकांचा आनंद घेतलेल्या प्रेक्षकांच्या चेहऱ्यावरही महोत्सव समारोप करताना समाधान आणि ताजेपणा स्पष्टपणे दिसत होता.

# श्रीनाथ मंदिर परिसरातील अतिक्रमणाविरोधात नागरिक आक्रमक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जामखेड तालुक्यातील मौजे नायगाव येथील श्रीनाथ मंदिर परिसरात वाढलेल्या अतिक्रमणांविरोधात स्थानिक नागरिकांनी आक्रमक भूमिका घेतली असून, अतिक्रमणे तात्काळ हटविण्याची मागणी प्रशासनाकडे करण्यात आली आहे. या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे.

युवराज अर्जुन गायकवाड (रा. नायगाव, ता. जामखेड) यांनी दिलेल्या निवेदनानुसार, श्रीनाथ मंदिर परिसर व ग्रामपंचायत हद्दीत काही




व्यक्तींनी अनधिकृतपणे टपऱ्या, दुकाने व इतर बांधकामे उभारून जागा अडवून ठेवली आहे. यामुळे स्थानिक नागरिकांना ये–जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, सार्वजनिक जागेचा वापर मर्यादित झाला आहे.

निवेदनात असेही नमूद करण्यात आले आहे की, ग्रामपंचायतीकडून या अतिक्रमणांकडे दुर्लक्ष होत असून, उलट काही प्रमाणात अतिक्रमणधारकांना पाठबळ मिळत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे या समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, प्रशासनाने याकडे तत्काळ लक्ष न दिल्यास २० मे २०२६ पासून पंचायत समिती, जामखेड कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

# इंटरनॅशनल अबॅकस कॉम्पिटिशनमध्ये 'अमेझिंग'च्या १३० विद्यार्थ्यांचा सहभाग

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**





**अहिल्यानगर–** चेन्नई येथील ईसीएमएस या संस्थेने आयोजित केलेल्या अबॅकस ऑफलाइन इंटरनॅशनल कॉम्पिटिशनमध्ये नगरमधील अमेझिंग अबॅकसच्या राज्यभरातील २० शाखांमधील १३० विद्यार्थी सहभागी झाले होते. पाईपलाईन रोडवरील श्रीकृष्ण हॉल येथे झालेल्या या स्पर्धेत अमेझिंगच्या नगरमधील शाखांसह मुंबई, नागपूर, पुणे, सिल्लोड, आळंदी, बुर्हाणनगर आदी शाखांचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

अबॅकसच्या या इंटरनॅशनल ऑफलाईन स्पर्धेत अमेझिंग अबॅकसच विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग नोंदविला. स्पर्धेच्या नियोजनासाठी अमेझिंग अबॅकसचे संचालक किरण बल्लाळ आणि संचालिका अश्विनी बल्लाळ यांच्यासह शिक्षिका प्रज्ञा विभूती, डिंपल शर्मा, जयश्री कांबळे, शिल्पा निर्मळ, श्रद्धा देशमुख, कांचन दंडाळे यांनी परिश्रम घेतले.

अबॅकस ही मानसिक गणना आणि समस्या सोडवण्याची क्षमता वाढवण्याची एक पारंपारिक पद्धत आहे. विद्यार्थ्यांची एकाग्रता बौद्धिक क्षमतावृद्धीबरोबरच जलद व अचूक गणना करण्यासाठी अबॅकस महत्त्वाचे साधन ठरले आहे. हे महत्त्व ओळखून अमेझिंग अबॅकसने राज्यभरात २० शाखा स्थापन केल्या आहेत. त्याचा उपयोग विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीसाठी होत आहे, असे संचालिका अश्विनी बल्लाळ यांनी सांगितले.

# वर्धमान महावीर कॉलेज ऑफ नर्सिंग येथे थॅलेसेमिया जनजागृती कार्यक्रम संपन्न

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** वर्धमान महावीर कॉलेज ऑफ नर्सिंग यांनी आनंद ऋषीजी हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटर यांच्या सहकार्याने आज ''थॅलेसेमिया मुक्त भविष्यासाठी एक पाऊल'' या थीम अंतर्गत थॅलेसेमिया जनजागृती कार्यक्रम यशस्वीरीत्या आयोजित केला.

हा कार्यक्रम आनंद ऋषीजी हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटरचे प्रशासकीय अधिकारी डॉ. आशिष भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.या जनजागृती सत्रात सिव्हिल हॉस्पिटलचे थॅलेसेमिया समन्वयक डॉ. हरिश पांढरे तसेच डॉ. आशिष हारमळ यांनी थॅलेसेमियाची कारणे, प्रतिबंध, लवकर निदान व व्यवस्थापन याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

विशेषतः विवाहपूर्व थॅलेसेमिया तपासणीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. थॅलेसेमिया हा आनुवंशिक आजार असल्यामुळे दोन्ही होणाऱ्या पती–पत्नींनी विवाहपूर्व रक्ततपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे. योग्य वेळी तपासणी केल्यास आजाराचा प्रसार रोखता येतो व भविष्यातील पिढीला या आजारापासून संरक्षण मिळू शकते, असे त्यांनी सांगितले.

''आजची तपासणी, उद्याची सुरक्षित पिढी!'' असा संदेश यावेळी देण्यात आला. या कार्यक्रमात वर्धमान महावीर कॉलेज ऑफ नर्सिंग तसेच आनंद ऋषीजी नर्सिंग इन्स्टिट्यूटचे विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. जैन सोशल फेडरेशनच्या सहकार्याने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजन उपप्राचार्य डॉ. विद्या ठोकळ तसेच इतर प्राध्यापक व कर्मचारी यांच्या सहकार्याने यशस्वीरीत्या करण्यात आले.

हा कार्यक्रम अत्यंत माहितीपूर्ण व उपयुक्त ठरला असून विद्यार्थ्यांमध्ये थॅलेसेमियाबाबत जागरूकता वाढविण्यास मदत झाली. एकंदरीत, हा कार्यक्रम यशस्वी ठरला असून थॅलेसेमिया मुक्त भविष्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरला.

# नगर लाड सुवर्णकार समाजास कै. सनी लोळगे स्मरणार्थ दोन लाख रुपयाची देणगी

**समाजाच्या उद्धारासाठीचा कुलथे कुटुंबीयांचा दातृत्व भाव प्रेरक – संजय देवळालीकर**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आपण ज्या समाजामध्ये मोठे झालो त्याच्या उद्धारासाठी, प्रगतीसाठी पुढे आलेले लोळगे कुटुंबाच्या दातृत्वाचे दानशूर हात समाजाच्या पुढील वाटचालीस प्रेरक असल्याचे उद्गार अहिल्यानगर लाड सुवर्णकार समाजाचे अध्यक्ष संजय देवळालीकर यांनी व्यक्त केले.

सोलापूर येथील उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते करण धनंजय लोळगे व कुटुंबीयांनी कैलासवासी सनी धनंजय लोळगे यांच्या स्मृती प्रित्यर्थ अहिल्यानगर लाड सुवर्णकार समाजास दोन लाख एक हजार रुपयाची देणगी दिली. यावेळी आयोजित कार्यक्रम प्रसंगी संजय देवळालीकर बोलत होते.

याप्रसंगी उद्योजक धनंजय व सौ विजया लोळगे ,सौ पूजा लोळगे ,सामाजिक कार्यकर्ते रमेश अकलूजकर, पुरुषोत्तम शहाणे , लाड सुवर्णकार समाजाचे विश्वस्त शरद कुलथे, श्याम मुंडलिक ,गणेश डहाळे, योगेश नागरे, प्रकाश देवळालीकर ,विनोद कुलथे, सुनील देवळालीकर ,सुरेश मैड उपस्थित होते. उद्योजक करण लोळगे यांनी यावेळी बोलताना समाजाच्या सामाजिक कार्यात आपला सहयोग असावा ,वंचित व गरजू बंधू–भगिनींना प्रगतीच्या प्रवाहात येण्यासाठी लोळगे कुटुंबीयांनी हा सहयोग दिला आहे. भविष्यातही अशाच प्रकारे सातत्यपूर्ण सहयोग कायम राहील असे प्रतिपादन केले.

उपस्थित मान्यवरांचा सन्मान लाड सुवर्णकार समाजाचे वतीने करण्यात आला. यावेळी गुलाब वाफगावकर, संध्या निसळ व समाजबांधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश मैड तर आभार शरद कुलथे यांनी मानले.

# मदर्स डे विशेष सोहळा २०२६ – अर्हम् गर्भसंस्कार साधना

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अर्हम् गर्भ साधना, अहिल्यानगर यांच्या वतीने मदर्स डे निमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



दिनांक १० मे २०२६, रविवार रोजी सायंकाळी ५.३० ते ७.३० या वेळेत कोहिनूर मॉल येथे हा प्रेरणादायी सोहळा संपन्न होणार आहे. अर्हम् विद्या प्रणेते ऋषी प्रवीणजी यांच्या मार्गदर्शनाखाली सन १९९६ पासून गर्भ संस्कार, मातृत्व जागृती आणि सकारात्मक जीवनमूल्यांवर आधारित साधना दिली जात आहे. याच परंपरेतून अर्हम् गर्भ साधनेचे प्रशिक्षित शिक्षक अहिल्यानगर येथे हा विशेष कार्यक्रम घेणार आहेत. गर्भ साधना म्हणजे केवळ आईची नव्हे तर संपूर्ण कुटुंबाच्या सकारात्मक, निरोगी आणि संस्कारमय भविष्यासाठीची सुंदर तयारी. आईच्या विचारांचा, भावनांचा आणि वातावरणाचा बाळावर होणारा प्रभाव समजावून देणारा हा उपक्रम अनेकांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

कार्यक्रमामध्ये मनोरंजन व प्रेरणादायी उपक्रम मजेशीर खेळ व आकर्षक बक्षिसे ''एक पेड़ माँ के नाम'' विशेष उपक्रम संपूर्ण कुटुंबासाठी आनंदाचा अनुभव सर्व माता व कुटुंबीयांनी आवर्जून उपस्थित राहून या आनंदमय उत्सवाचा भाग व्हावे, असे आयोजकांकडून आवाहन करण्यात येत आहे. दिनांक: १० मे २०२६ वेळ: सायंकाळी ५.३० ते ७.३० स्थळ: कोहिनूर मॉल आयोजन: अर्हम् गर्भ साधना, अहिल्यानगर ''संस्कारित मातृत्वातून उज्ज्वल भविष्याची सुरुवात''

# धनादेश अनादर प्रकरणी आरोपीची निर्दोष मुक्तता

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** फिर्यादी महात्मा फुले मल्टीस्टेट को ऑप क्रेडीट सोसायटी, भिंगार, अहिल्यानगर यांना विजय मुरलीधर कुलकर्णी यांनी थकीत कर्जापोटी जामिनदार म्हणून दिलेला धनादेश अनादरीत झाला असल्याने त्यांचे विरुध्द निगो. इंन्स्ट्रु. ॲक्टचे कलम १३८ अन्वये अहमदनगर येथील मा. मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब, यांचे न्यायालयात केस दाखल झालेली होती. सदर केसची अति. मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब, अहमदनगर यांचे न्यायालयात सखोल चौकशी होवून, पुराव्याअंती व आरोपींतर्फे केलेला बचाव मा. न्यायालयाने ग्राह्य धरुन, सदर प्रकरणातील आरोपीची पुराव्याअभवी निर्दोष मुक्तता केलेली आहे.

खटल्याची थोडक्यात माहिती अशी की, अमरनाथ अण्णा जोशी यांना फिर्यादी पतसंस्थेने व्यवसाय वाढीसाठी रक्कम रु.७०,०००/– चे कर्ज दिलेले होते सदर कर्जास आरोपी विजय मुरलीधर कुलकर्णीं हे जामिनदार होते. सदर कर्जाची परतफेड कर्जदार करीत नसल्याने फिर्यादी संस्थेने आरोपीस जामिनदार या नात्याने थकीत कर्ज रक्कमेची मागणी केली असता, सदर आरोपीने सदर कर्जदाराचे थकीत कर्ज रक्कमेचे परतफेडीपोटी रक्कम रु.१,३०,०००/– चा चेक दिला असता, तो अनादरीत झाल्याने फिर्यादीने संस्थेने आरोपीचे विरुध्द या न्यायालयात निगो. इंन्स्ट्रु. ॲक्टचे कलम १३८ प्रमाणे फिर्याद दाखल केली. सदरील खटल्याची सुनावणी नुकतीच अति. मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब कर्वे साहेब यांचे न्यायालयात पार पडली व त्यांनी सदर प्रकरणी आरोपी विजय मुरलीधर कुलकर्णी यांचे वतीने ॲड. अमित सुरपुरीया यांनी केलेला युक्तीवाद/बचाव ग्राह्य धरुन, आरोपीची सदर खटल्यातुन निर्दोष मुक्तता केलेली आहे.

सदर प्रकरणातील आरोपी यांचेतर्फे अहिल्यानगर येथील ॲड. अमित सुरपुरीया यांनी काम पाहिले असून त्यांना ॲड.ए.एस. जाधव यांनी सहकार्य केलेले आहे.

(पान १ वरुन)

## पोलीस अधीक्षक साहेब नवीन आहात, जिल्ह्यातील भामट्या सोनारांच्या मुसक्या आवळा

वेळाने झोप लागल्यानंतर त्या महिलांनी संधी साधून बडाख यांच्या बॅगेतील सोन्याचे दागिने चोरून नेले.अहिल्यानगर बसस्थानकावर उतरल्यावर हा प्रकार लक्षात येताच बडाख यांनी तात्काळ कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. पोलिसांनी तत्परतेने तपास करत माया कल्याण भोसले (रा. हादगाव, ता. शेवगाव) हिला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान तिने गुन्ह्याची कबुली देत चोरीचे सोने बोधेगाव येथील सराफ व्यावसायिक भागवत मधुकर आदापुरे याला विकल्याचे सांगितले. यानंतर पोलिसांनी संबंधित सराफाकडून कायदेशीर पंचनामा करून चोरीचे सर्व सोने जप्त केले. त्यामुळे पीडित महिलेला दिलासा मिळाला आहे.मात्र, या प्रकरणात चोरीचे सोने खरेदी करणाऱ्या सराफावर अद्याप गुन्हा दाखल करण्याची त्यांनी मागणी केली आहे.

## नियमबाह्य पद्धतीने सभासदत्व नाकारणाऱ्या मर्चंटस बँकेला हायकोर्टाचा दणका

सीईओची हकालपट्टी केली पाहिजे. मर्चंटस बँकेचे सहकारमहर्षी असलेले चेअरमन व संचालक मंडळाच्या मनमानी आणि नियमबाह्य कारभाराला पुन्हा एकदा कायद्याने चपराक बसली आहे. सभासदत्व मिळण्यासाठी योग्य नियमाखाली अर्ज करूनही संचालक मंडळ तो अर्ज नियमबाह्य पद्धतीने फेटाळून लावतात. परंतु यापूर्वीही अशाच अनेक प्रकरणात बँकेविरूद्ध निकाल आले आहेत. चेअरमन व संचालक मंडळाला मर्चंटस बँक ही सहकार कायद्यानुसार चालते याचा विसर पडला आहे, अशी टीका राजेंद्र चोपडा यांनी केली आहे.

## इंदोरीकर महाराजांच्या मुलीच्या लग्नात चेन स्नॅचिंग करणाऱ्यांना दोघांना बेड्या

लग्नातील पाहुण्यांचे सहा तोळे वजनाचे सोन्याचे दागिने कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेले होते. या प्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. एलसीबीच्या तपासात तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे हा गुन्हा रेकॉर्डवरील आरोपी सागर सुरेश कांबळे याने साथीदारांसह केला असल्याचे निष्पन्न झाले व आरोपी सोन्याची वाटणी करण्यासाठी मोटारसायकलवर ममदापूर फाटा येथे येणार असल्याची माहिती प्राप्त झाली.

पथकाने तात्काळ ममदापूर फाटा येथे सापळा रचून सागर सुरेश कांबळे व बबलु उर्फ अब्दुल इब्राहिम पिंजारी यांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी हा गुन्हा इतर साथीदार आतिक आयुब उर्फ आरीफ शेख व सनी विलास ढोकणे (दोघेही रा.वार्ड नं.०२ श्रीरामपूर) यांच्या साथीने केल्याची कबुली दिली. या दोघांचा शोध सुरू आहे. आरोपीच्या ताब्यातून ७० हजार रुपये किमतीचे दोन मोबाईल, ७० हजार रुपये किमतीची मोटारसायकल व १ लाख ४९ हजार ५०० रुपये किमतीचे साडेअकरा ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असा एकूण २ लाख ८९ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## जामखेड नगरपरिषदेचे दोन कर्मचारी तीन हजाराची लाच घेताना रंगेहाथ पकडले

करण्यास सांगितले असता त्याप्रमाणे तक्रारदार यांनी लोकसेवक भैसडे यांचे सांगणेवरून लोकसेवक शेख यांना संपर्क केला असता लोकसेवक शेख हे तक्रारदार यांचेकडे दोन्ही मुलांचा जन्मदाखला देण्याकरीता लोकसेवक भैसडे यांचेकरीता प्रत्येक दाखल्याचे १५००/– रूपये याप्रमाणे दोन जन्म दाखल्यांचे ३,००० /– रूपये लाचेची मागणी करत असल्याची तकार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अ. नगर कार्यालयात दिनांक ०५/०५/२०२६ रोजी प्राप्त झाली होती. तक्रारदार यांनी दिलेल्या तकारीप्रमाणे दिनांक ०६/०५/२०२६ रोजी लाच मागणी पडताळणी वेळी तक्रारदार यांनी लोकसेवक अभिजीत भैसडे यांची नगरपरिषद जामखेड येथे भेट घेतली असता लोकसेवक भैसडे यांनी तक्रारदार यांना लोकसेवक शेख यांची भेट घेण्यास सांगितले असता लोकसेवक भैसडे यांचे सांगणे प्रमाणे तक्रारदार यांनी लोकसेवक शेख यांची भेट घेतली असता लोकसेवक शेख यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे मुलाचा व मुलीचा जन्म दाखला देण्या करीता लोकसेवक भैसडे यांचेसाठी प्रति जन्म दाखल १,५००/– रूपये याप्रमाणे दोन जन्म दाखल्यांचे ३,००० /– रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याची संमती दर्शवली व दिनांक ०६/०५/२०२६ रोजी यशस्वी सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक शेख यांनी जामखेड नगरपरिषद समोर तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष ३,०००/– रूपये लाचेची रक्कम स्विकारली असुन लोकसेवक शेख यांनी तक्रारदार यांचेकडुन स्विकारलेल्या लाच रक्कमेस लोकसेवक भैसडे यांनी समती दर्शवुन लाच स्विकारण्यास प्रोत्साहन दिलेले आहे.

सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक राजु आल्हाट, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर २) पर्यवेक्षण अधिकारी पोलीस उप अधिक्षक अजित त्रिपुटे,

सापळा पथक :– १) पोना चंद्रकांत भिमसेन काळे २) पो कॉ किशोर विठठल कुळधर ३)पोकॉ शेखर बाळासाहेब वाघ ४) चालक पोहेकॉ दशरथ भिमराव लाड सर्व नेम– ला.प्र.वि.अहिल्यानगर वरील प्रकरणाचा तपास पोलीस उप अधीक्षक अजित त्रिपुटी हे करत आहेत. कारवाई भारत तांगडे पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, माधव रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक. यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे. आवाहन – लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवका बद्दल तकार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, टि.व्ही सेंटर समोर,सावेडी, अहिल्यानगर करण्यात आले आहे.